डहाणू मित्र

# जमनाधर अग्रवाल माध्यमिक विद्यालय येथे सायबर जागरूकतेचा उपक्रम!



जोगेश्वरी दि. ५: डिजिटल सुरक्षिततेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि तरुणांना आवश्यक सायबर सुरक्षा सक्षम करण्यासाठी , अस्मिता संचालित जमनाधर अग्रवाल माध्यमिक विद्यालय, येथे क्विक हील फाऊंडेशन आणि पाटकर-वर्दे महा विद्यालय यांच्या संयुक्युत विद्यमाने आज एका संवादपर सायबर सुरक्षा जागरूकता सत्राचे आयोजन करण्यात आले.

हे सत्र क्विक हील फाऊंडेशनच्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ' या प्रमुख अभियानांतर्गत आयोजित करण्यात आले होते. माझा डेटा , माझी जबाबदारी या यंदाच्या मुख्य संकल्पनेवर आधारित, या कार्यक्रमाने वैयक्तिक डिजिटल ठसे सुरक्षित ठेवण्यासाठी वैयक्तिक मालकी आणि पूर्वकाळजी उपायांचे महत्त्व अधोरेखित केले.

हे सादरीकरण पाटकर-वर्दे महाविद्यालयाच्या दोन प्रशिक्षित विद्यार्थी सायबर वॉरियर्स वेदांत रत्नाकर गोसावी आणि साहिल संजय ढेबे यांनी केले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री.संतोष फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यवेक्षिका सौ विजया रुपेश गोळे यांनी शालेय विज्ञान मंडळ प्रमुख श्री वळकुंदे आणि सौ मयेकर , विज्ञान मंडळ कार्यकारणी विद्यार्थी यांच्या मदतीने शालेय विज्ञान मंडळा अंतर्गत या उपक्रमाचे आयोजन केले.

सत्रा दरम्यान, सायबर वॉरियर्सनी विद्यार्थी आणि शिक्षकांना खालील महत्त्वाच्या डिजिटल धोक्यांबद्दल माहिती दिली आणि मार्गदर्शन केले.

डेटा संरक्षण आणि गोपनीयता

ऑनलाइन फसवणूक (डलरी) ओळखणे.

सोशल मीडियाचा सुरक्षित वापर

सायबर गुन्ह्याची नोंद/तक्रार करणे

याप्रसंगी बोलताना , अस्मिता संचलित जमनाधर अग्रवाल माध्यमिक विद्यालयाच्या प्रतिनिधींनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि सांगितले की , आजच्या तंत्रज्ञानस्नेही पिढीसाठी व्यावहारिक डिजिटल साक्षरता अत्यंत महत्त्वाची आहे. संस्थेने पाटकर-वर्दे महाविद्यालयाचे विद्यार्थी सायबर वॉरियर्स आणि क्विक हील फाऊंडेशन यांनी त्यांच्या शाळेत आयोजित केलेल्या या महत्त्वपूर्ण जनजागृती उपक्रमा बद्दल आभार व्यक्त केले.

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा ' सारख्या उपक्रमांद्वारे, क्विक हील फाऊंडेशन आणि पाटकर-वर्दे महा विद्यालय जबाबदार डिजिटल नागरिकांचे जाळे (नेटवर्क) तयार करण्याचे कार्य निरंतर करत असून, त्याद्वारे तरुणांना अधिक सुरक्षित ऑनलाइन जीवन जगण्यासाठी सक्षम केले जात आहे.